जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १८२ दिनांक - २१/०३/२०२५**

खराडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## घरफोडी चोरीचा गुन्हा खराडी पोलीसांनी अवघ्या २४ तासाचे आत छडा लावून चोरी करणा-या महिलेस मुद्देमाल सह केले जेरबंद

फिर्यादी ह्या आपले घर सोसायटी,खराडी,पुणे येथे भाड्याचे राहण्यास असून त्या एका खाजगी कंपनीमध्ये हाऊस किपींगचे काम करून आपला उदनिर्वाह करतात फिर्यादी यांनी कष्ट करून थोडे थोडे करून घेतलेले सुमारे आडीच तोळे सोने व ३० हजार रु.रोख रक्कम ही त्यांनी त्यांचे घरातील लोखंडी कपाटामध्ये ठेवलेली होती.

फिर्यादी ह्या दि.१७/०३/२०२५ रोजी नेहमी प्रमाणे सकाळी १०:१५ वा.चे सुमारास त्यांचे हाऊस किपींगचे कामा करीता घरातील लोखंडी कपाट व घराचे दरवाजास कुलुप लावून कामावर निघुन गेल्या.त्यानंतर त्या रात्री ८:०० वा.चे सुमारास घरी परत आल्या असता त्यांना घराचे दरवाजाचे कुलुप तुटलेले व घरातील लोखंडी कपाट कशाचे तरी सहाय्याने उचकटल्याचे दिसल्याने त्यांनी कपाटातील सोन्याचे दागीणे व रोख रक्कम पाहिली असता त्यांचा ऐवज तेथे नसल्याचे दिसल्याने कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांचे घरामध्ये चोरी केल्याचे त्यांचे लक्षात आल्याने त्याबाबत खराडी पो.स्टे.येथे गुन्हा भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) नोंद आहे.

दाखल गुन्हया बाबत,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खराडी पो.स्टे.श्री.संजय चव्हाण यांनी खराडी पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे प्रमुख पो.उप.निरी श्री.राहुल कोळपे.व डि.बी.स्टाफला तपासा बाबत सुचना दिल्या त्या अनुषंगाने खराडी पो.स्टे.चे तपास पथकातील **पोलीस हवालदार सुरेंद्र साबळे** यांना त्यांचे खास बातमीदाराने बातमी दिली कि एक महिला खराडी परिसरामध्ये सोने विकण्याच्या प्रयत्नात आहे. त्यानुसार सुरेंद्र साबळे यांनी सदरची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय चव्हाण,यांना दिली असता त्यांनी डि.बी.स्टाफ मधील पोलीस आधिकारी व पो.अमंलदार व पो.महिला अमंलदार यांची एक टिम तयार करून त्यांना रवाना करुन सदर महिलेस शिताफीने ताब्यात घेतले.तिला तिचे नाव विचारले असता तिने आपले नाव अनिता शषीराव नवसागर,वय ३१ वर्षे,रा.आपले घर सोसा.खराडी,पुणे.असे असल्याचे सांगीतले.तिचेकडे असलेल्या सोन्याबाबत विश्वासात घेऊन अधिक तपास केला असता तिने सांगीतले की,ती फिर्यादी राहत असलेल्या बिल्डींगमध्ये राहण्यास असून फिर्यादी यांचे कामाची वेळ तिला माहित असल्याने फिर्यादी बाहेर जाताच तिने कुलुप तोडून व कपाट उचकटुन कपाटातील सुमारे आडीच तोळ्याचे सोन्याचे दागीने व रोख ३० हजार रु.चोरल्याची कबुली देऊन तो ऐवज पोलीसांना काढुन दिल्याने तो पोलीसांनी गुन्ह्याचे पुरावे कामी जप्त केला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशीक विभाग,पुणे शहर श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ ४,पुणे शहर,श्री.हिंम्मत जाधव, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर श्रीमती प्रांजली सोनवणे,यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खराडी पो.स्टे श्री.संजय चव्हाण, पो.उप.निरी श्री.राहुल कोळपे.तपास पोलीस अमंलदार सुरेंद्र साबळे,महेश नाणेकर,श्रीकांत शेंडे अमित जाधव,सचिन रणदिवे,सचिन पाटील,मुकेश पानपाटील,सुरज जाधव,श्रीकांत कोद्रे,म.पो.अंमलदार थोरात,वाघमारे,मालवडे यांचे पथकाने केली आहे.

